
द्राक्ष विशेषांक

Registered Date of Publication : शुक्रवार, ७ ऑक्टोबर
Posted at BPC Vishrambagwada CSO Pune Daily.
आर.एन.आय. MAHMAR/2005/RNI No. 14922
रजि. नं. PCW/081/2021-2023

सकाळ अॅग्रोवन

शुक्रवार, ७ ऑक्टोबर २०२२ / १६



# काढणीपश्चात व्यवस्थापनातील दक्षता

**योग्य पद्धतीने द्राक्ष काढणी केल्यामुळे साठवणीतील टिकाऊपणा वाढण्यास मदत होते. घड काढणीदरम्यान योग्य व्यवस्थापन तंत्राचा अवलंब केल्यामुळे काढणीपश्चात हाताळणीदरम्यान होणारे नुकसान कमी करता येते.**

**डॉ. प्रशांत निकुंभे, डॉ. निशांत देशमुख, डॉ. आर. जी. सोमकुंवर**

द्राक्ष हे अतिशय संवेदनशील आणि नाशिवंत फळपीक आहे. द्राक्ष काढणीपूर्व आणि काढणीपश्चात योग्य व्यवस्थापन न केल्यास मोठे आर्थिक नुकसान होते. योग्य पद्धतीने द्राक्ष काढणी केल्यामुळे साठवणीतील टिकाऊपणा वाढण्यास मदत होते. घड काढणीदरम्यान योग्य व्यवस्थापन तंत्राचा अवलंब केल्यामुळे काढणीपश्चात हाताळणीदरम्यान होणारे नुकसान कमी करता येते.

द्राक्ष काढणीनंतर द्राक्षाचे नुकसान प्रामुख्याने दोन कारणांनी होते. पहिले म्हणजे मण्यामधील पाणी बाष्पीभवनाद्वारे कमी होऊन द्राक्षमणी सुकतात (गळ होते) आणि दुसरे मण्यांची बुरशीमुळे होणारी कुज, द्राक्षे सुकल्यामुळे त्यांचा रंग, चकाकी, ताजेपणा, टवटवीतपणा कमी होतो. परिणामी फळकूज देखील वाढते. मण्यांतील पाणी टिकवून ठेवण्यासाठी द्राक्षाची पक्वतेची लक्षणे ओळखून योग्यवेळी काढणी करावी. योग्य प्रतवारी करून पॅकिंग करावे. मण्यांचा तजेलदारपणा टिकवून ठेवण्यास, बाष्पीभवनाची तीव्रता कमी करण्यासाठी तसेच मण्यांतील उष्णता काढून टाकण्यास पूर्वशीतकरण महत्त्वाचे आहे. द्राक्ष घडांचे पूर्वशीतकरण शीतगृहात साठवण करून विक्रीचे नियोजन करावे. त्यामुळेच संभाव्य नुकसान टाळणे शक्य होते.

## प्रतवारी

- घड वेलीवरून काढल्यानंतर खराब झालेले, डाग असलेले, अगदी छोटे किंवा मोठे मणी काढण्याचे काम सावलीतच करावे. घडातील मण्यांचा एकसारखेपणा, त्यांचा रंग व पक्वता इत्यादी बाबींचा विचार करून द्राक्ष घडाची प्रतवारी करावी.
- द्राक्षाचे साठवणीतील आयुष्यमान वाढविण्यासाठी देठाची मण्याशी असलेली पकड ही मजबूत असणे आवश्यक असते. ही पकड मजबूत असेल तरच बाहेरील देशातील निर्यात आणि देशांतर्गत पाठविली जाणारी द्राक्ष यांचे आयुष्यमान चांगले राहते.

## निर्यातक्षम द्राक्षांसाठी रासायनिक अंशाचे नियंत्रण

भारतातील उत्पादित द्राक्षाला परदेशांतील विविध बाजारपेठांमध्ये मोठी मागणी आहे. काही देशांच्या द्राक्ष आयातीविषयक धोरणे अवलंबली आहेत. त्यातील रासायनिक अंश ही बाब प्रामुख्याने आयातीतील द्राक्षामध्ये तपासली जाते. अशावेळी द्राक्ष उत्पादकांनी पीक संरक्षणाच्या महत्त्वाच्या बाबींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

- द्राक्ष बागायतदारांनी पीक संरक्षणातील पीएचआय (PHI) व एमआरएल (MRL) या दोन गोष्टीं चा अत्यंत गांभीर्यापूर्वक विचार करायला हवा. त्यासाठी रासायनाचे अवशेष निरीक्षण कार्यक्रमाचा (Annexure ५) अवलंब करून निर्यात करण्याची गरज आहे.
- द्राक्ष उत्पादनामध्ये अधिकृत केंद्रीय कीडनाशक मंडळ व नोंदणी समिती शिफारशीनुसार कीडनाशकांचा वापर करावा.
- रासायनिक फवारणीनंतर शिफारस केलेला काढणीपूर्व कालावधी संपल्यानंतरच द्राक्ष काढणी करावी.
- कीडनाशक व बुरशीनाशक उत्पादनाचे लेबल क्लेम काळजीपूर्वक वाचावेत.
- कीडनाशक व बुरशीनाशक फवारणीपूर्वी आर्थिक नुकसान पातळी विचारात घेऊन आवश्यकता असेल तरच फवारणी करावी.
- रासायनिक कीडनाशकांचा व बुरशीनाशक वापर पिकांच्या वाढीच्या सुरुवातीच्या काळात करावा.
- घड काढणीच्या काळात जैविक घटकांचा उपयोग करून एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा.
- द्राक्ष घड काढणीपूर्वी किमान एक ते दीड महिना अगोदर रासायनिक कीडनाशकाची फवारणी बंद करावी. त्याऐवजी जैविक कीडनाशकांचा अधिक वापर करावा.
- निर्यातीपूर्वी द्राक्षमालाची कीडनाशक अंश तपासणी करावी. निर्यातीतील द्राक्षांमध्ये रासायनिक अंश नसण्याची खात्री करावी आणि नंतरच निर्यात करावी.